एक विनम्र सत्यशोधक आणि बहुआयामी साहित्यिक

# डॉ. श्रीराम गुंदेकर : व्यक्ती आणि वाङ्मय


संपादक - डॉ. नरसिंग कदम

सहसंपादक - प्रा. संजीवकुमार माने


कथासंग्रह

१) उचल

२) [illegible]

बालकविता संग्रह

१) [illegible]

२) श्रेष्ठ कोण : [illegible] की मांजर

समीक्षा ग्रंथ

१) ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन

२) म. जोतिबा फुले: साहित्य आणि साहित्यमूल्ये

३) म. जोतिबा फुले: विचार आणि वाङ्मय

४) सत्यशोधकी साहित्य: परंपरा आणि स्वरूप

संपादित ग्रंथ

१) बळीबा पाटील

२) [illegible]

३) देशभक्त [illegible]

४) सत्यशोधकी निबंध

नवसाक्षरांसाठी पुस्तिका


१) राजर्षी शाहू महाराज

इतिहास लेखन

१) सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड १

२) सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड २

३) सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड ३






Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंध / लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | परिवर्तनाचे वाटसरू : डॉ. श्रीराम गुंदेकर<br>**डॉ. गोविंद काळे** | १५ |
| २. | ग्रामीण साहित्याचे गाढे अभ्यासक:डॉ.श्रीराम गुंदेकर<br>**प्राचार्य, चंद्रशेखर कळसे** | २२ |
| ३. | सत्यशोधकी साहित्याच्या इतिहास लेखनातील डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे योगदान<br>**डॉ. प्रशांत भंडे** | २९ |
| ४. | डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकी इतिहास लेखन<br>**डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले** | ३६ |
| ५. | डॉ.श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय साहित्य लेखन– एक आकलन<br>**डॉ. नवनाथ पवळे** | ४७ |
| ६. | सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे इतिहास लेखन<br>**प्रा.सौ.सुनिता शिवाजी घुले** | ५४ |
| ७. | सत्यशोधकी साहित्याचा इतिहास–डॉ.श्रीराम गुंदेकर लिखित खंड १ व खंड २ : सैद्धान्तिक विचारधारा<br>**डॉ. भगवान वाघमारे** | ५९ |
| ८. | ‘उचल’ कथासंग्रहातील स्त्री प्रतिमा<br>**प्रा. रमेश शेंडगे** | ६८ |
| ९. | लगाम कथासंग्रहातील स्त्रीचित्रण<br>**डॉ. बालाजी डिगोळे** | ७१ |
| १०. | ‘कुऱ्हाडीचे दांडे’ मधील मूल्यभ्रष्टता आणि सत्यशोधकी दृष्टिकोन<br>**डॉ. बिभिषण कांबळे** | ७९ |


Scanned with CamScanner

# डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकी इतिहास लेखन

डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा.
मो. नं. ९४२१४४८१०७

## प्रस्तावना

डॉ. श्रीराम गुंदेकर हे विनम्र सत्यशोधक, साक्षेपी समीक्षक, प्रभावी कथालेखक, आणि सत्यशोधकी इतिहासकार – विचारवंत म्हणून सामाजिक, सांस्कृतिक साहित्य विश्वात सर्वपरिचित आहेत.

सत्यशोधकी विचार परंपरेमध्ये आजच्या 'सत्यशोधकी साहित्यात' डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे स्थान, त्यांचे 'सत्यशोधकी साहित्य इतिहासातील' योगदान बहुजन समाजाला अधिक उन्नत करणारे आहे. त्यांच्या सत्यशोधकी निष्ठेबद्दल, कार्याबद्दल तसेच त्यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधकी साहित्याच्या इतिहासाबद्दल लिहिण्याचे कारण म्हणजे आज डॉ. श्रीराम गुंदेकर आपल्यात नाहीत, (त्यांना आपल्यातून जाऊन येत्या १२ जानेवारी २०२४ ला सहा वर्ष होतील) हे खरे आहे.तरीही मन ते मानायला तयार होत नाही. शरीराने ते आपल्या मध्ये नसले,तरी वैचारिक दृष्ट्या ते आपल्या सर्वांच्या खूप जवळ आहेत आणि कायम राहतील. त्याचाच पुरावा म्हणजे गुंदेकर सरांचे विदयार्थी राहिलेले उदगीरचे डॉ.नरसिंग कदम आणि संजीवकुमार माने हे दोन प्राध्यापक मिळून ''डॉ. श्रीराम गुंदेकर: व्यक्ती आणि वाङ्मय'' या शीर्षकाचा संपादकीय ग्रंथ काढत आहेत. प्रस्तुत संपादित ग्रंथासाठी गुंदेकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या



Scanned with CamScanner

साहित्यिक, संशोधक प्राध्यापक आणि त्यांचे विद्यार्थी म्हणून मी ही संशोधन लेख द्यावा अशी विनंती संपादक द्वयीनी केल्यामुळे मी ''डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकी इतिहास लेखन'' या विषयावर लेख लिहला आहे. त्यात माझ्या अभ्यासाच्या मर्यादा मुळे काही त्रुटी असू शकतात, अभ्यासकानी त्यात जरूर भर घालावी. हे नम्र पणे सूचित करू इच्छितो.

डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकी इतिहास लेखन पाहण्यापुर्वी म. फुले यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधक समाजाचा म्हणजेच सत्यशोधकी साहित्याचा संक्षेपाने इतिहास पाहणे प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने महत्वाचे ठरणार आहे.

**महात्मा फुले सत्यशोधक समाज आणि साहित्य -**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील सत्यशोधक चळवळ ही एक गतिशील परिवर्तनवादी सामाजिक, साहित्यिक चळवळ होती. महात्मा फुले यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्या अगोदरच महात्मा फुले यांच्या ''निर्मिकाचा शोध'' या पद्यपुस्तिके पासून इ. स.१८५३ मध्ये सत्यशोधकी साहित्याची निर्मिती सुरू झाली होती, मात्? सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर महात्मा फुले यांनी आपल्या सामाजिक कार्याला संघटनात्मक स्वरूप प्राप्त करून दिले. धर्मसत्तेखाली भरडलेले व अर्थसत्तेखाली पिळले गेलेले शेतकरी, शेतमजूर, दलित, पददलित, स्त्रिया आदी शोषित जनसमूह सत्यशोधक चळवळीच्या केंद्रस्थानी होते. सत्यशोधक चळवळीने अमुलाग्र सामाजिक परिवर्तनाचा आग्रह धरला. बहुजन समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचा अपूर्व लढा दिला. सत्यशोधक चळवळ खेड्यापर्यंत पोहोचलेली आधुनिक भारतातील पहिली प्रबोधनपर लोकचळवळ होती. हजारो वर्षापासून दबलेल्या, पिचलेल्या, शोषलेल्या जनसमूहाने प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आपले मानवी हक्क व मानवी प्रतिष्ठेसाठी पुकारलेले ते एक लोक आंदोलन होते. सत्यशोधक चळवळीचा मराठी जनसमूहांच्यावर दूरगामी परिणाम झाला. आधुनिक महाराष्ट्राचा पुरोगामी विचार घडविण्यात सत्यशोधक चळवळीचे सर्वाधिक श्रेय आहे.



Scanned with CamScanner

## सत्यशोधकी साहित्याचा संक्षिप्त इतिहास-

सत्याचा शोध ही नवी गोष्ट नाही. जगामध्ये सर्व काळात, स देशांत, सत्याचा शोध घेणारे महामानव निर्माण होत असतात. सर्व मानवी समाजाच्या हिताच्या गोष्टींचा पुरस्कार ते करतात. काही लोक आपला वंश, धर्म, पंथ, रंग, वर्ण, जात एवढ्या मर्यादित माणूस समूहाच्या हिताचा विचा करतात. असा संकुचित विचार सर्व मानवी सुखाला बाधा आणणारा ठरतो, म्हणून त्यांना विरोध करावा लागतो. भारतामध्ये मूळ क्षेत्रजांची सिंधू संस्कृ नांदत होती. ती विकसित व उन्नत संस्कृती होती. त्या संस्कृतीतील राजे आणि लोक सुखी जीवनाकडे वाटचाल करीत होते. इहजीवनाचा, लौकिक जीवनाच विचार करणारी त्यांची मूल्यसंस्कृती होती. त्यानंतर आर्य आक्रमकांनी येथे प्रवेश केला. शेकडो वर्ष त्यांच्या रानटी क्रूर टोळ्यांचे आक्रमण होत राहिले, येथील जीतांना त्यांनी दास, भूत, पिशाच्च, असुर, राक्षस, नाग, द्रविड ठरवले. त्यांना जंगल दऱ्याखोऱ्यात जाऊन आश्रय घ्यावा लागला.

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत सत्यशोधनाचा दोन छावण्या (विचारप्रवाह) अस्तित्वात आहेत. त्यातील एक छावणी वैदिक, तर दुसरी अवैदिक. या दोन्ही छावण्यांमध्ये वाद -युक्तिवाद, चर्चा होऊन, ईश्वर स्वर्ग-नरक इत्यादी कल्पना आणि विचार या विरुद्ध काही मीमांसकांनी चिंतन पूर्वक मोठी भर घातली आहे. बळीराजापासून विकसित होऊन चार्वाक-बुद्ध- महावीर यांच्यापर्यंत आलेल्या या परंपरेने आपापल्या वैशिष्ट्यांसह या विचाराला एका उंचीवर नेऊन पोहोचविले. त्यात प्रामुख्याने जैन, बौद्ध, सांख्य, शाक्त, लोकायत, शैव, या परंपराचा समावेश होतो.

मध्ययुगीन काळात नाथ, वीरशैव, महानुभव, आणि वारकरी या पंथ संप्रदायाच्या माध्यमातून आलेला विचार तत्कालीन काळाच्या व्यवहारावर नैतिक आणि वैचारिक दृष्ट्या 'विद्रोहाच्या' स्वरूपात पुढे आला. त्याला अध्यात्माचे तात्त्विक अधिष्ठान होते, ते बुद्धाच्या मंगल सम्यक तत्वज्ञानाचे. अशा पद्धतीने अवैदिक पद्धतीचा वारसा काहीसा विस्कळीत स्वरूपात बदलत्या परिवेशात मध्ययुगीन संत परंपरेने बहुजन समाजापर्यंत पोहोचविला. त्यात 'सत्य -असत्याशी मन केले ग्वाही मानियले नाही बहुमता' या आत्मविश्वासाने



Scanned with CamScanner

व काहीशा धिटाईने संत तुकारामांनी या परंपरेवर कळस चढविला.

वैदिक ब्राह्मणी परंपरेने वर्णजाती संस्थेच्या सनातन दाव्यासाठी जे काही 'धर्मग्रंथ' म्हणविले जात होते, त्याचा वापर करून त्याला शब्दप्रामाण्याची, 'सनातन' पणाची मेख मारून समाजात पोथी- निष्ठा कायम केली. त्यामधून भावी पिढ्यांचे हितसंबंध प्रस्थापित करून भारतीय संस्कृतीचे समतेचे सहिष्णुतेचे, सर्वसमावेशकतेचे तत्त्व झाकोळून टाकण्याचा प्रयत्न केला; परंतु या परंपरेविरुद्ध अवैदिक परंपरांनी तिच्या सर्व प्रकारच्या तथाकथित सैद्धांतिक व नैतिक दाव्याचा फोलपणा उघड केला. त्यामधील कर्मकांडाचा, अतार्किक अवैज्ञानिक आशय उलगडून बहुजन समाजाला सावध केले. एवढेच नव्हे,तर पर्यायी सैद्धांतिक आणि नैतिक भूमिका ठाम पणे मांडून सत्यशोधनाची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवली. परिणामी, या परंपरेने वैदिकांच्या कुठल्याही प्रकारच्या भेसळीला न जुमानता काळानुरूप बदलत कारुण्य, सौजन्य, न्याय व समानतेचा पुरस्कार करत सत्यशोधनाचा अमीट ठसा उमटविला.

बहुजन समाजाची ही समतावादी न्यायदर्शी मानवतावादी परंपरा समकालीन युगपुरुषांच्या तत्वज्ञानातून पुढे आली व प्रस्थापित झाली. त्यांचे तत्त्वज्ञान आचार त्यांच्या व्यक्तिगत व पंथाच्या नावाने समाजात प्रसृत होऊन मान्यता पावले. परिणामी, या परंपरेला 'सत्यशोधक चळवळी'च्या आधुनिक युगातील जे काही आकृतीबंध, चौकट वा सिद्धांत होते, त्यांची पायाभरणी परंपरेने भक्कम केली, असे म्हणता येईल. म्हणूनच पुढे सुमारे इ.स.१८४८ते १९५०पर्यंतच्या सत्यशोधक चळवळीच्या शेतकी विचारांचा प्रभाव बहुजन समाजाच्या जीवनावर प्रत्यक्ष -अप्रत्यक्षपणे कायम राहिला.

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या जीवनातील सर्व क्षेत्रांना या विचाराने प्रभावित करून कार्यप्रवृत केले. ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध लढण्याची ऊर्जा दिली, आत्मविश्वास वाढविला. म्हणूनच 'नवनिर्मिती'चा विद्रोह महात्मा ज्योतिराव फुले यांच्या साहित्य व कृती मध्ये आला होता. तोच आज तात्त्विक आणि व्यावहारिक पातळ्यांवर एका 'परंपरे'चा रूपात 'सत्यशोधकी तत्वज्ञान' म्हणून मान्यता पावला आहे. प्रस्थापित ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या आचार, विचार आणि कृतीचा



Scanned with CamScanner

आधार घेतला जातो. मग ती चळवळ जातीय अथवा वर्गीय अंगाने मांडणी करणारी असो. सत्यशोधक चळवळीच्या परंपरेचा 'वारसा' सांगत व 'वसा' घेऊनच वर्तमानातील सर्व चळवळी कार्यरत झालेल्या दिसतात. जी बाब 'चळवळी' संदर्भात खरी आहे, तीच किमान महाराष्ट्रातील विचारवंत, लेखकाच्या बाबतीतही आढळते. प्रत्यक्ष सत्यशोधक चळवळीने 'सत्यशोधक' म्हणून ही भूमिका कदाचित स्पष्टपणे मांडली नसेल. आपला तसा आग्रह देखील नसावा; परंतु त्यांची चळवळ, विचारातील स्पष्टता त्यांनी हाताळलेले मार्ग यांचा विचार करता, सत्यशोधकी साहित्यचळवळी चा उद्देश, बहुजन समाज सर्वांगांनी बहरून यावा, हाच आहे!.

**सत्यशोधकी साहित्य प्रवाहाचे वेगळेपण-**

मराठी साहित्यामध्ये मध्य युगापासून विविध प्रवाह आहेत असे मानले जाते. वारकरी, महानुभाव, नाथ, वीरशैव, इ. साहित्य प्रवाह संप्रदायानुसार मानले जातात. तर यादव काळातील साहित्य, शिवकालीन साहित्य, पेशवाईतील साहित्य हे राजकीय कालखंडा नुसार निर्माण झालेले प्रवाह म्हणून माणण्यात येतात; तर बखर साहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी साहित्य असे ही काही प्रकार साहित्यात मानले जातात. स्वातंत्र्य पुर्व काळात प्रादेशिक साहित्य, मार्क्सवादी साहित्य, गांधीवादी साहित्य, जनवादी साहित्य, पुरोगामी साहित्य, असेही प्रकार मानले गेले.१९६०नंतर दलित, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, कामगार साहित्य, भटक्याचे साहित्य, आदिवासी साहित्य असे प्रवाह मानले आहेत.

साहित्यामध्ये कोणताही साहित्य प्रवाह आपले वेगळेपण घेऊन येतो. पण फक्त वेगळेपणाला प्रवाह मानता येत नाही. वेगळा प्रवाह मानण्यासाठी काही निकष निश्चित केलेले आहेत. आणि ते सर्व निकष सत्यशोधकी साहित्य प्रवाहामध्ये आहेत म्हणून 'सत्यशोधकी साहित्य' हा आधुनिक मराठी साहित्यात वेगळा प्रवाह ठरतो.

**सत्यशोधकी साहित्यप्रवाहाचे निकष -**

सर्व प्रकारचे कर्मकांड नाकारणारे, मानवता मूल्यांचा, विवेकनिष्ठेचा पुरस्कार करणारे साहित्य सत्यशोधकी साहित्य असते. सत्यशोधकी साहित्या



Scanned with CamScanner

मध्ये सत्यशोधकी संवेदना आणि जाणिवा महत्त्वाच्या असतात. हेच सत्यशोधकी साहित्याचे निराळेपण आहे. हे निराळेपण सत्यशोधकी साहित्याने पुढील निकषाच्या माध्यमातून पुर्ण केले आहे. डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकी साहित्याचे निकष पुढील प्रमाणे सांगितले आहेत. १.सातत्य २.विविध साहित्य प्रवाहाची निर्मिती. ३. ललित आणि वैचारिक साहित्याची निर्मिती.४. सृजनात्मक प्रक्रियेत स्त्री - पुरुषांचा सहभाग. ५. ग्रामीण - शहरी सर्व वर्णजातीय व्यावसायिकांचा सहभाग. ६. स्वतःच्या प्रकाशन संस्था. ७. स्वतःची वितरण व्यवस्था. ८.लेखक, प्रकाशक, वाचक यांचा वाङ्मय व्यवहार. ९. स्वतंत्र सामाजिक काव्य, नाटक, कादंबरी लेखन. १०. कृतिप्रेरक साहित्याची निर्मिती. (सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड पहिला. पृ.८) या सर्व निकषाची पूर्तता सत्यशोधकी साहित्याने केली असल्यामुळे आधुनिक मराठी साहित्यातील महत्वाचा प्रवाह म्हणून सत्यशोधकी साहित्याचा विचार आता प्रस्थापित झाला आहे.''

या पार्श्वभूमीवर म. फुले म्हणजे सत्यशोधक समाज आणि साहित्य चळवळ असे एक सोपे समीकरण मांडले जाते. त्यामुळे सत्यशोधक चळवळीतील अन्य कार्यकर्त्यांचा सहभाग नकळत दुर्लक्षित राहतो. सत्यशोधक समाज हा एकखांबी तंबू नव्हता, तर एक लोकचळवळ होती. म. फुले यांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राच्या सर्व भागातील सत्यशोधक कार्यकर्त्यांनी विविध माध्यमातून सत्यशोधक चळवळ गतिमान केली. प्रस्तुत ठिकाणी सत्यशोधकी साहित्य प्रवाहाचे ऐतिहासिक लेखन करणाऱ्या मराठावाड्यातील डॉ. श्रीराम गुंदेकर, यांच्या सत्यशोधकी इतिहास लेखनाविषयी त्यांच्या योगदानविषयी सविस्तर मांडणी लेखात केली आहे. गुंदेकर हे सत्यशोधकी चळवळीतील महत्वाचे संशोधक आहेत.त्यांनी आपल्या सर्वच लेखानातून म. फुले यांच्या सत्यशोधकी भूमिकेचा विस्तार केलेला दिसून येतो.

**सत्यशोधकी साहित्याचा पहिला इतिहासकार - डॉ. श्रीराम गुंदेकर**

डॉ. श्रीराम गुंदेकर यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९५५ मध्ये बीड जिल्ह्यातील आंबेसावळी या खेडेगावात सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. वडील वारकरी असल्यामुळे लहानपणी त्यांच्यावर धार्मिक संस्कार झाले.



Scanned with CamScanner

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी कष्टपुर्वक आणि चिकाटीने प्राथमिक, माध्यमिक शिक्षण पूर्ण केले होते. त्यावेळी ७ वी स्कॉलरशिप मध्ये पहिला आल्याबद्दल तत्कालीन मंत्री सुंदरराव सोळुंके यांच्याकडून त्यांचा सत्कार झाला होता.त्यानंतर पुढील शिक्षणासाठी बीड येथील नवगण महाविद्यालयातून पीयुसी चे शिक्षण पुर्ण करून बी. ए. प्रथम वर्षाला बलभीम मध्ये प्रवेश घेतला.पदवी ला असताना गुरु म्हणून डॉ. नागनाथ कोतापल्ले सरां सारख्या गुरूंचा सहवास लाभल्यामुळे पुरोगामी विचाराचे संस्कार होऊन त्यांचे व्यक्तीमत्व अधिक तावून सलाखून निघाले. याच काळात म्हणजे १९७२-७६ च्या दरम्यान महाराष्ट्रातील विद्यार्थी संघटनाच्या संपर्कात आल्यामुळे सामाजिक प्रश्नाकडे पाहण्याची नवी समज आणि जाणीव प्राप्त झाली.१९७८ मध्ये औरंगाबाद विद्यापीठातून एम. ए. मराठी मध्ये पदव्युत्तर होऊन लातूरच्या नामांकित शिक्षण संस्थेत नोकरीला लागले. आणि लातूर हीच त्यांची तपोभूमी आणि कर्मभूमी झाली.

डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी विद्यार्थीदशेतच आधुनिक महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीतील साहित्य प्रवाहाचे वाचन केले होते त्याचा बारकाईने अभ्यास केला होता. त्यामुळे प्राध्यापक म्हणून नोकरीला लागल्यानंतर पीएच.डी. चे संशोधन करण्यासाठी त्यांनी ''महात्मा ज्योतिबा फुले : विचार आणि वांङ्मय'' हा विषय निवडून म. जोतिबा फुले आणि सत्यशोधकी साहित्याचा संशोधन अभ्यास हीच ध्येयनिश्चिती केली होती. त्यामुळे त्यांच्या जीवनाची पुढील वाटचाल व जीवनप्रवास जाणीवपूर्वक 'सत्यशोधकी साहित्यिक'असा नियोजन बद्ध झाला. परिणामी, दिशाहीन जगणे त्यांच्या वाट्यास आलेच नाही. कटलेल्या पतंगाप्रमाणे भरकटलेले जगणे त्यांना ठाऊक नव्हते. त्यामुळे 'सत्यशोधकी साहित्यप्रवाहा' मध्ये आयुष्यभर गुणात्मक भरच घालीत राहिले. 'महात्मा फुले यांच्या विचाराचे भाष्यकार' अशी स्वतःची ओळख निर्माण करुन त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य तह्यात सत्यशोधकी विचार व प्रचारासाठी समर्पित केले.म. फुले यांचे विचार आणि साहित्याचा अभ्यास करता करता ते स्वतःच सत्यशोधक झाले. 'महात्मा जोतीराव फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये', 'सत्यशोधकी साहित्य परंपरा आणि स्वरूप', ग्रामीण साहित्य:



Scanned with CamScanner

प्रेरणा आणि प्रयोजन', 'महाराष्ट्राचे शिल्पकार : सम्यक क्रांतीचे प्रणेते सत्यशोधक महात्मा फुले', हे त्यांचे समीक्षा ग्रंथ याची साक्ष देतात. त्यांच्या ग्रामीण कथासुद्धा (लगाम आणि उचल) महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या आहेत.

डॉ. श्रीराम गुंदेकर हे अलीकडच्या काळातील 'सत्यशोधकी साहित्याचे'पुरस्कर्ते आणि चिकित्सक अभ्यासक म्हणून वांङ्मय चळवळीतील लेखक, वाचक, अभ्यासकांना सुपरिचित आहेत.त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग मार्फत संशोधन प्रकल्पासाठी "सत्यशोधकी साहित्याचा इतिहास" अश्या चार बृहद खंडात्मक ग्रंथाचे संशोधन पुर्ण करून वर्तमान काळात विद्यापीठीय संशोधन कसे असावे, याचा आदर्श वस्तुपाठ डॉ. गुंदेकरांनी घालून दिला आहे. चार खंडापैकी सत्यशोधकी साहित्याच्या इतिहासाचे दोन खंड त्यांच्या हयातीतच प्रकाशित झाले आहेत. उर्वरित दोन खंडाच्या प्रकाशनाची जबाबदारी सायन प्रकाशनाचे प्रकाशक, नितीन कोतापल्ले यांनी स्वीकारली होती. त्याचे प्रकाशन नितीन कोत्तापल्ले यांनी केल्याबद्दल खरे तर त्यांचे ही अभिनंदन! करायला हवे. प्रस्तुत लेखात गुंदेकरांच्या पहिल्या आणि दुसऱ्या खंडाविषयी भाष्य केले आहे.तिसरा आणि चौथा खंड उपलब्ध लेखन काळात उपलब्ध होऊ न शकल्यामुळे त्यावर भाष्य केलेले नाही. त्यामुळे या लेखाची मर्यादा वाचकांनी समजून घ्यावी. डॉ. श्रीराम गुंदेकर हे सत्यशोधकी साहित्याचे पहिले इतिहासकार म्हणून त्यांच्या साहित्याचा संक्षेपाने विचार दोन खंडाच्या अनुषंगाने केलेला आहे.

**सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड पहिला -**

ज्या सत्यशोधकी चळवळीमुळे महाराष्ट्रातील राजकारणास नवी दिशा मिळाली, बहुजनांचे राजकारण सुरू झाले, तथाकथीत बहुजन सत्तेवर आले; पण यापैकी एकालाही असे वाटले नाही की त्या सत्यशोधकी चळवळीचा साहित्याचा स्वतंत्र असा अभ्यास व्हावा. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून, तालुक्यातून व शहरातून जे 'सत्यशोधकी साहित्य' विखुरलेले आहे, त्याचा संग्रह व्हावा, चळवळीचा इतिहास नवीन पिढी समोर आणण्यासाठी त्याचे टोलेजंग असे संग्रहालय उभे करावे, बहुजनांची भाषा करणाऱ्या सत्ताधारी



Scanned with CamScanner

किंवा विरोधी पक्षालाही कधी यासंबंधी काही ठोस कृती- कार्यक्रम घ्यावा, असे वाटले नाही किंवा एखाद्या विद्यापीठात 'सत्यशोधकी साहित्याचे' अभ्यास केंद्र किंवा अध्यासन उभे करावे, असेही वाटले नाही. ही अशी अवस्था असताना डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या सारख्या संवेदनशील मनाच्या प्रखर सत्यशोधक प्राध्यापकास यासंबंधी काही करावेसे वाटले. ही फार मोठी ऐतिहासिक गोष्ट आहे.कारण यासाठी प्रचंड मोठा आर्थिक भार सोसावा लागणार होता. याची माहिती असूनही त्यांनी ते अतिशय चिकाटीने जीवनदानी पद्धतीने स्वीकारले. सत्यशोधकी साहित्याची साधने गोळा करताना, राज्यभर विखुरलेल्या सहिंताचे संकलन करताना, डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी १५वर्ष अपार कष्ट घेतले. या ग्रंथाच्या सिद्धतेसाठी त्यांनी केलेली धडपड पाहून म्हाइंमभटाने 'लीळाचरित्राच्या' निर्मिती साठी केलेल्या अथक परिश्रमाची व अजोड निष्ठेची आठवण होते. हे रामप्रसाद तौर यांनी गुंदेकरांच्या बाबतीत केलेला उल्लेख अगदी रास्त आहे. (स्मृतिगंध सत्यशोधक श्रीराम गुंदेकर, पृ.१७८).

'सत्यशोधकी साहित्याचा इतिहास' (खंड पहिला, में २०१०) हा ग्रंथ सुमारे ७०२ पृष्टाचा आहे. प्रारंभी दहा बारा पाणात डॉ. गुंदेकरांनी मनोगतातून लेखनामागील भूमिका व दिशा मुद्देसूद आणि थोडक्यात मांडली आहे. १८५३ ते १९२० पर्यंतचा सत्यशोधकी साहित्याचा इतिहासाची विभागणी पाच प्रकरणात केली आहे.

१. सत्यशोधकी साहित्याची परंपरा, २.सत्यशोधकी साहित्याची पार्श्वभूमी, ३. आधुनिक सत्यशोधकी साहित्याची पायाभरणी १८५३-१९००, ४. सत्यशोधकी साहित्याचा जोरकस आविष्कारआणि ५. सत्यशोधकी साहित्याचा बहारदार कालखंड. अश्या पाच प्रकरणातून हा ग्रंथ लिहिताना गुंदेकरांनी एकूणच इतिहास लेखनाच्या स्वरूपाकडे, त्याच्या गुणदोषाकडे पाहिले आहे. अशा प्रकारचे लेखन करताना हमखास तोल जाणाऱ्या निसरड्या जागांची त्यांना जाण आहे. त्यामुळे उपलब्ध लेखनातील विविध प्रकारच्या मांडणीतील दोष आपल्या लेखनात येऊ नयेत, याची खबरदारी त्यांनी घेतली आहे. आपल्या लेखनाचे स्वरूप कसे आहे, कालानुक्रम कसा ठेवलेला आहे,



Scanned with CamScanner

विविध साहित्यप्रकारानुसार लेखन न करता, लेखकानुसारी काळानुक्रम जाणीवपूर्वक ठेवण्यात आला आहे. आजवर ज्यांच्या चरित्राचा, साहित्याचा, कर्तुत्वाचा साधा परिचयही नव्हता, असे अनेक लेखक त्यांच्या निर्मितीसह डॉ. गुंदेकर यांनी आपल्यासमोर साक्षात उभे केले आहेत. या लेखकांना आपल्या लेखनामागील प्रेरणांची चांगली जाणीव होती. 'काव्यशास्त्र', 'विनोद'हे प्रस्थापित प्रयोजन या लेखकांना मान्य नव्हते. पैसा कीर्ती सन्मान या अनुषंगिक लाभांची कल्पनाही त्यांना कधी शिवली नाही ते लेखन म्हणजे न्याय समता बंधुता मानव मुक्ती साठी लढणाऱ्या शूर योद्ध्यांनी इथल्या प्रस्थापित व्यवस्थेशी चाललेली लढाई होती. या जाणिवेने सत्यशोधक यांची सारी निर्मिती ओथंबलेली दिसते. डॉ. गुंदेकरांनी अतिशय जिव्हाळ्याने या लेखकांच्या लेखनाचा सांगोपांग लेखाजोखा मांडला आहे. असे करताना त्यांच्यातला चिकित्सक सत्यशोधक कुठेच कमी पडत नाही, असे खात्रीने सांगता येते.

**सत्यशोधकी साहित्याचा इतिहास (खंड दुसरा) -**

हा महाकाय ग्रंथ ०४नोव्हेंबर २०१३ ला प्रकाशित झाला.या दुसऱ्या खंडात १९२१ते १९५०पर्यंतच्या ३० वर्षाच्या इतिहासाची मांडणी दोन विभागात केली आहे. कारण डॉ. श्रीराम गुंदेकरांच्या मते, हाच काळ (१९२०ते १९५०) सत्यशोधकी साहित्याच्या बहराचा काळ होता. (मनोगत पृ.५) पहिल्या भागात इ.स. १९२१-३५ पर्यंत च्या एकूण ३६लेखकांच्या साहित्याचे व दुसऱ्या भागात १९३६-५०या काळातील एकूण ३२लेखकांच्या साहित्याचे विवेचन - विश्लेषण करण्यात आले आहे. म्हणजे या दुसऱ्या खंडात एकूण ६८ लेखकांच्या साहित्याचा समावेश आहे. यात एकही स्त्री लेखिका नाही. पहिल्या खंडात एकूण ६७ वर्षाच्या कालखंडात एकूण ३२ लेखकांचा समावेश आहे. आणि त्यात चार स्त्री लेखिका आहेत. म्हणजे ज्या वेळी स्त्री शिक्षणाचा अगदी आरंभिक काळ होता, त्या वेळच्या स्त्रियांनी लेखन कार्य केलेले आहे; पण नंतरच्या तीस वर्षात स्त्री शिक्षणाचा प्रचार प्रसार होऊन देखील 'सत्यशोधकी साहित्य प्रवाहात' एक ही लेखिका नसावी, हे आश्चर्यजनकच म्हणावे लागेल. दुसरे आश्चर्य म्हणजे पहिल्या खंडात मराठेत्तर लेखक आहेत. पण दुसऱ्या खंडातील ६८ लेखकापैकी दोन -एक अपवाद सोडले,

तर सर्वच्या सर्व मराठा जातीतीलच आहेत. याचा अर्थच असा की, सत्यशोधक चळवळ ही १९२० नंतर बहुजनातील सर्वांची चळवळ न राहता, केवळ मराठा जातीपर्यंतच मर्यादित झाली. ही तशी चिंतेची बाब! खंड ३ व ४ प्रकाशित झाल्यानंतर यासंबंधी आणखी विचार करता येईल. असे डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी गुंदेकरांच्या स. सा. इ. खंड दुसरा यावर भाष्य करताना म्हटले ते अगदी दुर्लक्षित करता येणार नाही. (स्मृतिगंध सत्यशोधक श्रीराम गुंदेकर पृ.१७८)

डॉ.गुंदेकर यांचे १२जानेवारी २०१८रोजी अकाली निधन झाले आणि त्यांच्या जाण्याने सत्यशोधक साहित्य चळवळीचे आणि साहित्य संशोधनाचे कधी ही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. त्यांच्या नंतर कालप्रवाहात सत्यशोधक साहित्य चळवळीने पुन्हा एकदा सत्यशोधकी विचार सर्व जातीपर्यंत म्हणजे मागासवर्गीय व पुरोगामी सवर्णापर्यंत घेऊन जाण्यासाठी एकत्रित प्रयत्न करने गरजेचे आहे. तसा प्रयत्न ''डॉ. श्रीराम गुंदेकर : व्यक्ती आणि वाङ्मय'' या प्रस्तुत ग्रंथाच्या संपादक द्वयीने केल्याबद्दल त्यांचे मनपूर्वक अभिनंदन!! करून थांबतो.!

टीप : या लेखा साठी खालील संदर्भ ग्रंथाचा आधार घेतला आहे.

**संदर्भ सूची -**


१. सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड पहिला मुक्तरंग प्रकाशन, लातूर. प्र. आ.मे, २०१०, प्रस्तावना

२. सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड दुसरा सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर. प्र.आ.४ नोव्हेंबर,२०१३, मनोगत.

३. स्मृतिगंध सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर संपादक, डॉ. हंसराज भोसले, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन,
लातूर.प्र.आ.१२ जाने.२०१९, संपादकीय,

४. तत्रैव, पृ.१६९, १७८




Scanned with CamScanner

एक विनम्र सत्यशोधक आणि बहुआयामी साहित्यिक

**डॉ. श्रीराम गुंदेकर : व्यक्ती आणि वाङ्मय**

संपादक - **डॉ. नरसिंग कदम**

सहसंपादक - **प्रा. संजीवकुमार माने**

---

**ISBN - 978-93-92464-69-0**

---

**प्रभाकर पब्लिकेशन**

३०४, विंग-सी, सिद्धीविनायक अपार्टमेंट,

सुतमील रोड, लातूर

मो. ८६००८८११२७, ८१४९१५३०१८

© **सर्व हक्क लेखकाधीन**

प्रथम आवृत्ती

**१२ ऑक्टोबर २०२३**

मुद्रक

**पवन ऑफसेट, लातूर**

अक्षर जुळवणी

**रोहित टायपिंग सेंटर, लातूर**

मुखपृष्ठ रेखाटन

**विरभद्र गुळवे, लातूर**

**मूल्य ₹ - २५०/-**

---

*सूचना : या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुर्ननिर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून लेखकाची लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या ग्रंथातील लेखकांच्या मताशी संपादक, सहसंपादक प्रकाशक, मुद्रक, वितरक सहमत असतीलच असे नाही.